ISSN 2278-8204

International Monthly Research Journal For All Subjects

# AKSHARDEEP

Volume - II ▪ Issue - VII ▪ January 2014



Editor
Ganpu Lahane

# अनुक्रमणिका



| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Complexes of Copper (II) and Nickel (II) with 1 - (2 - amino phenyl - 3 methyl pyrazolone) | N. A. Kedar<br>S. D. Dhage<br>D. G. Palke | 01 |
| 2. | Area, Production and Yield of Seasamum Crop In Nanded District | Dr. Choudhari Govind | 06 |
| 3. | 'नागार्जुन संवाद' - नागार्जुन के बुनियादी व्यक्तिमत्त्व की खोज | प्रा. डॉ. खाजी मुख्तारोदीन | 08 |
| 4. | हिन्दी साहित्य में आलोचना उद्भव एवं विकास | पांडे विक्रम अशोक | 12 |
| 5. | दौड़ उपन्यास में आधुनिक वोध | शेख मोहसीन इब्राहीम | 16 |
| 6. | रोजगार निर्माण में हिन्दी की भूमिका | शेख मुजमील इब्राहीम | 19 |
| 7. | साठोत्तरी हिन्दी और कन्नड कवयित्रियों का काव्य : परिचय | आडे गणपती रावण | 23 |
| 8. | कवीर के विचारों की प्रासंगिकता | प्रा. खलंग्रे आर. डी. | 27 |
| 9. | क्षमताधिष्ठित शिक्षक शिक्षणाच्या संदर्भात अभ्यास | प्रा. शिंदे सुशिल शेषेराव | 29 |
| 10. | आधुनिक मराठीतील सामाजिक जाणीव | प्रा. सरोजा वैजनाथ कोळवे | 35 |
| 11. | स्त्री मनाचा हळूवारपणा आणि भक्तीची उत्कटता : संत जनावाई | डॉ. संजीवकुमार पांचाळ | 39 |
| 12. | महिलांचे ऐतिहासिक जीवन आणि सद्यस्थिती | प्रा. डॉ. शामला एम. देशमुख<br>प्रा. एच. एल. सोनकांबळे | 41 |
| 13. | विशेष आर्थिक क्षेत्र निर्मिती एक आव्हान | प्रा. डॉ. विरादार वी. एम. | 45 |
| 14. | पंचवार्षिक योजनांच्या अंतर्गत भारतीय शेतीचा विकास | प्रा. मठपती नागनाथ वाबूराव | 49 |
| 15. | प्राचीन भारतीय समाजातील गुन्हेगारी | प्रा. डॉ. वसंत व्यंकटराव कदम | 51 |
| 16. | स्त्री - भ्रूणहत्या एक सामाजिक कलंक | प्रा. कंधारे नंदा पंढरीनाथ | 54 |
| 17. | जागतिकीकरण आणि आदिवासींच्या समस्या | प्रा. डी. के. कदम | 58 |
| 18. | भारतातील भाववाढ : कारणे, परिणाम आणि उपाययोजना | प्रा. डॉ. पवार सुदाम वसंतराव | 62 |

Research Paper In Sociology

International Monthly Research Journal, Akshardeep

58

ISSN 2278-8204
Vol.II, Issue : VII
January, 2014

# जागतिकीकरण आणि आदिवासीच्या समस्या

प्रा. डी. के. कदम
समाजशास्त्र विभाग प्रमुख
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय
हिमायतनगर, जि. नांदेड

भारतीय संविधानाच्या समानतेच्या हक्कातील अनुच्छेद १४,१५ अन्वये कायद्यापुढे समानता आणि कोणत्याही नागरिकाला धर्म, वंश, जात, लिंग, यावरून भेदभाव करण्यास मनाई आहे. उद्देशिकेत तर नागरिकास सामाजिक, आर्थिक, राजनैतिक न्याय, दर्जा व संधीची समानता बहाल केली आहे. याच तत्वाच्या अधीन राहून सरकार काम करते. वास्तवात काही दुर्बल घटकांना न्याय मिळवून देऊन त्यांना किकास प्रक्रियेत आणण्यात सरकारला काही अंशी यश मिळाले, पण या विकासाच्या प्रक्रियेत आदिवासी दुर्लक्षीत व वंचित राहिला आहे.

भारतीय सरकारने सुविधा उपलब्ध करून दिल्या त्याचा लाभ काही विशिष्ट जमातींनी घेतला. जास्तीत-जास्त आदिवासी जमाती अतिदुर्गम भागात वास्तव्य करतात. त्यामुळे त्यांच्या पर्यंत दळण-वळणाची सुविधा, शिक्षण, आरोग्य या सुविधा पोहोचल्या नाहीत. आज जगातिकीकरण,खाजगीकरण,उदारीकरणाच्या प्रक्रियेत 'सामाजिक न्यायाच्या तत्वाकडे' दुर्लक्ष होत आहे. या प्रक्रियेत घटनेच्या सामाजिक न्याय तत्वाची पायमल्ली होत आहे. संपूर्ण भारताच्या सर्व घटकांवर व्यापक असा प्रभाव पडला आहे. त्यामुळे त्याचा प्रभाव आदिवासी जमातीवर सुद्धा पडला आहे. आदिवासी जमातीच्या समस्यांचा अभ्यास डॉ.जी.एस.दुर्ये, श्यामचरण दुबे, मजूमदार आणि मदन, निर्मलकुमार बोस, ए.आर.देसाई इत्यादीनी केला आहे.

'जगातिकीकरणाच्या प्रक्रियेत आदिवासीच्या समस्या' या शोध निबंधात आदिवासी म्हणजे कोण? आदिवासींच्या समस्या? जगातिकीकरण त्यादी उहापोह करण्यासीठी व सत्य शोधून काढण्यासीठी प्रस्तुत शोध विबंध सादार करीत आहे.

उद्दिष्ट्ये : प्रस्तुत शोध निबंधासाठी पुढील उद्दिष्टांची निश्चिती केली आहे.

1) आदिवासी जमातीचा अभ्यास करणे.

2) जागतिकीकरणाच्या संकल्पनेचा अभ्यास करणे.

3) जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आदिवासींच्या आर्थिक व आरोग्य या समास्यांचा अभ्यास करणे.

**संशोधन वद्धती :** 'जागतिकीकरण आणि आदिवासीच्या समस्या' या शोध निबंधाच्या अनुषंगाने संशोधन करण्याकरिता संशोधनाच्या उद्देशावर आधारीत दुय्यम सामुग्री शासकीय अहवाल, ग्रंथ, मासिके, दैनंदिन वर्तमान पत्रे इत्यादींचा अवलंब केला आहे.

**आदिवासी समूह :** आदिवासी समूह हा भारतीय समाजाचा महत्वाचा घटक असून तो एक संस्कृतिक वैशिष्ट्यापूर्ण संघटित जीवन जगणारा आहे. भारतात एकूण २५० आदिवासी जमाती आहेत. प्रत्येक जमातीची एक जीवन पद्धती वेगळी असते. प्रत्येक जमात दुसऱ्या जमातीपासून वेगळी आहे. आदिवासी समुहाची लोकसंख्या सर्वच राज्यात आढळते. काही राज्यात आदिवासी संख्या जास्त, तर काही राज्यात आदिवासींची संख्या कमी आहे. भारतात २००१ च्या जनगणेनुसार ८,४३,२६,०० एवढी आदिवासींची लोकसंख्या आहे. एकूण लोकसंख्येच्या ८.२० टक्के लोकसंख्या आदिवासीची आहे. सर्वात जास्त आदिवासींची लोकसंख्या झारखंड आणि छत्तीसगड या राज्यात आहे. त्यानंतर मध्यप्रदेश, ओरिसा, गुजरात, महाराष्ट्र, राजस्थान, पश्चिम बंगाल इत्यादी राज्यात आहे.

ISSN 2278-8204
Vol.II. Issue : VII,
January, 2014

खासी, गारो, नायर, गोंड, भिल्ल, कोरकू, वारली, नागा, बोडो प्रत्येक जमातीचे विशिष्ट नाव आसते. महाराष्ट्रात गोंड, कोरकू, वारली, कोलाम इत्यादी प्रमुख जमाती आहेत.

आदिवासी समूहाला वेगवेगळ्या नावाने संबोधले जाते. वन्यजाती, वनवासी, गिरीजन असेही म्हटले जाते. डॉ.व्हेरियर इल्विन आणि ठक्कर बप्पानी 'मुळचे निवासी', सरबैन्स ने 'पर्वतीय जनताती'. हट्टन ने 'आदिम जाती' डॉ.जी.एस.धुर्येने 'मागासलेले हिंदू' आणि राज्यघटनेत 'अनुसूचित जमाती' असे संबोधले आहे. जंगलात अतिदूर्गम भागात वास्तव्य करणाऱ्या समूहाला आदिवासी म्हटले जाते.

गिलिन आणि गिलीन यांनी 'सोशियोलोजी' या ग्रंथात 'विशिष्ट' भुप्रदेशावर वास्तव्य करणारा, एक समान्य बोलिभाषा बोलणारा, एक समान्य सांस्कृतिक जीनव जगणारा समूह म्हणणे आदिवासी होय" अशी व्याख्या केली आहे.

जागतिकीकरण : जागतिकीकरण ही संकल्पना विसाव्या शतकाच्या अखेरीस व एकविसाव्या शतकाक्या सूरूवातीस प्रत्यक्षात आली. भारताने सन १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केला, यातून जागतिकीकरणाला मूर्त रूप प्राप्त झाले. मुक्त अर्थाव्यवस्था वेगाने वाढू लागली. जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेत आदिवासी जमातीवर फार मोठे परिणाम होण्यास सुरूवात झाली.

रूसी मोदी : 'जागतिकीकरण म्हणजे संपूर्ण जगाची एकच बाजारपेठ निर्माण करणे आणि वस्तू व सेवा यांची विक्री करणे'

ब्रिटीशांचे भारतात आगमन होईपर्यंत आदिवासी निखळ आदिम संस्कृतीचे उपासक म्हणून ओळखले जात होते. निसर्ग पुजा करणे, पंचमहाभुतावर विश्वास ठेवून त्यांच्या प्रती आपल्या श्रद्धा व्यक्त करण्यासाठी धार्मिक विधी करणे, हिन्दू धर्मात साजरे केले जाणारे सण, उत्सव व रूढी प्रथा स्वीकार करून त्यामध्ये सहभाग नोंदवणे, ते समूह जीवन जगत होते. ब्रिटिशाचे भाहतात आगमन झाले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आदिवासीचा विकास झाला नाही. जगातिकीकरणाचा भारतताने स्वीकार केला असला तरी आदिवासींच्या आज ही समस्या आहेत.

आदिवासी समूह हा स्वतःला जंगलाचा राजा समजून, जांग ही त्यांची मालकी संपत्ती समजत होते. जंगलातील लाकूड कटाई, तेंदूपत्ता, फळे, डिंक, मध गोळा करून, जंगल कापून आपली स्थानांतरीत शेती करून आपला उदरविर्वाह भागवत होते. ब्रिटिशाने जंगलविषयक कायदे करून जंगल संपत्तीवर आदिवासींचा असलेला परंपरागत अधिकार संपूष्ठात आला. जंगल संपत्तीवर शासनाचा एकाधिकार प्रस्थापित झाला. वनअधिकारी आणि ठेकेदाराचा आदिवासीशी संपर्क आला. जंगलातील लाकुड कटाई, मध, डिंक, तेंदूची पाने एकत्रीत करण्याचे काम ठेकेदारी पद्धतीने करण्यात येवू लागले व जंगलाचे राजे असणारे आदिवासी वन आधिकारी आणि ठेकेदार वेठबिगार बनले. या ठेकेदारांनी आणि वनअधिकारांनी त्यांचे अर्थिक शोषण केले. तसेच आदिवासी लोक जंगल कापून स्थानांतरीत शेती करीत होते. शेती हे त्यांच्या उदरनिर्वाचे महत्वाचे साधन होते. स्थानंतरीत शेती करण्यावर प्रतिबंध घालण्यात आला. जंगलातील वस्तू गेळा करण्यास प्रतिबंध घातला. जंगलावर प्रिटिशांनी आपले नियंत्रण प्रस्थापित केले. आदिवासी जंगालापासून विस्थापित झाले जंगलाचा राजा समजणाऱ्या आदिवासीला प्रत्यक्ष इंचभर जागेवरही त्याचा हक्क राहिला नाही. आदिवासी माणूस जंगल, डोंगर, दऱ्या-खोऱ्यात राहणे जेथे जे पिकेल ते खाणे, जंगल वाढविणे ते सांभाळणे पर्यावरणाचे संतुलन राखणे हा स्वातंत्र्यानंतरचा ६२ वर्षाचा त्यांचा जीवन प्रवास राहीला आहे.

आजही मेळघाटात ३ लाख कोरकू जमातीचे लोक वास्तव्य करतात. यातील हे आदिवासी २७ टक्के जमीनीवर शेती करतात. कारण तेथील ७३ टक्के भाग जंगलाने व्यापलेला आहे. या कोरकू जमातीच्या

Research Paper In Sociology
International Monthly Research Journal, Akshardeep
ISSN 2278-8204
Vol.II. Issue : VII
January, 2014

उपजीवीकीचे शेती आणि जंग हे साधन होते. परंतु ही शेती मान्सूनवर आधारित असल्यामुळे त्याचे उत्पन्न अल्प आहे. सन् १९७४ मध्ये 'मेळघाट टायगर रिजर्व एरिया' घोषित केले. तसेच १९८० मध्ये वन विभागाने कंदमुळे, पाने, फळे, गोळा करण्यावर प्रतिबंध घातला आणि कोरकू जमातीला जंगलातून विस्थापित केले. त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला. आज ज्या आदिवासीकडे जमीन आहे, त्यांच्याकडे नैसर्गिक संसाधने आहेत. त्यावर मोठे उद्योगपती, शासन यांची करडी नजर पडली. जगातिकीकरणात सरकार सेझला, कारखान्याला, धरणाच्या नावाखाली शेकडो एकर जमीन परकिय कंपन्याना, व मोठ्या उद्योगपतींना देऊन आदिवासीला विस्थापीत करीत आहे.

महामुंबई सेझ, मुंद्रा सेझ, नगपूर आय.टी पार्क सेझ, मंगलोर सेझ, कोचीन सेझ इत्यादी म्हणजे राजकारणी आणि उद्योगपती हे संगनमत करून आदिवासी समूहाला लुटण्याचे काम आज जगातिकीकरणात चालू आहे. ज्यांची जमीन आज सेझ, कारखाना, धरणासाठी घेत आहेत ते लोक अर्थातय यामुळे विस्थापीत होऊन, त्यांची आर्थिक समस्या गंभीर बनत आहे.

आज जगातिकीकरणात विकासाच्या नावावर जी प्रक्रिया चालत आहे, या विकासाच्या प्रक्रियेतून आदिवासीच्या जीवनात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. 'नर्मदा धरण' निर्माण केल्यानंतर मध्यप्रदेश, महाराष्ट्र, गुजरात या तीन राज्यातील हजारो आदिवासी विस्थापीत झाले आहेत. नवीन कारणाके निर्माण करणे भिलाई येथील पोलास कारखाना, माही व बजाजनगर धरण इत्यादीमुळे हजारो आदिवासी विस्थाबीत झाले. त्यांचे पुनर्वसन अजून जाले नाही. मेघा पाटकर यांनी नर्मदा बचाव आंदोलन सुरू केले. परंतु आजूनही आदिवासी यांना न्याय मिळालेला नाही. त्यांचे पुनर्वसन झालेले नाही.

आदिवासी समाज प्रामाणिक, साधा भोळा, अज्ञानी, गरीब व मागासलेला आहे. परंतु आपली वैशिष्ट्यपूर्ण संस्कृतिक जीवन जगत आहे. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी आदिवासींच्या भोलेपणाचा फायदा घेऊन त्यांना धर्मांतर करण्यास भाग पाडले, आदिवासी भागात दवाखाने मुलांना शाळा, पैसा, नोकरी यासारखे वेगवेगळे अमिषे दाखवून त्यांना ख्रिश्चन धर्म स्वीकारण्यास भाग पाडले.

आदिवासी समुहातील बिगर धर्मांतरीत आदिवासी समूह व धर्मांतरीत आदिवासी समूह यांच्यात सांस्कृतिक वेगळेपणा निर्माण झाला. ज्यांनी धर्मांतर केले त्यांचा आदिवासी बांधवांशी संबंध तुटला. ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला तरी त्यांनी परंपरागत आदिवासी संस्कृतिचा त्याग केला नाही, ते परंपरागत सांस्कृतिक मुल्यावर, परंपरावर अत्यंत प्रेम करीत होते. त्यामुळे त्यांच्यात सामाजिक आणि व्यक्तिगत विघटन वाढत आहे. त्यांच्या जीवनात ताण तणाव, विरोध, अंतर्भाव निर्माण झाला.

महाराष्ट्रातील मेळघाटातील कोरकू आदिवासी मुलांच्या कुपोषणाची गंभीर समस्या आदिवासी जमतीचे लोक, ताड, तांदूळ, मोहफुल यापासून तयार केलेले मादक पदार्थ घेत, त्यावर शासनाने बंदी आणल्यामुळे आज आदिवासी देशी दारू पितात. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होतो. आरोग्याचा आणि आहाराचा संबंध आहे. आज गरीबीमुळे आदिवासींना दोन वेळच्या जेवणाचा अभाव, सकस आहाराचा अभाव, अपुरे कपडे इत्यादींचा अरोग्यावर परिणाम होतो. अमरावती जिल्ह्यातील मेळघाट भागातील ५१.४८ टक्के कुटूंबे दारिद्र्य रेषेखाली आहेत. या दारिद्र्याचा आरोग्यावर परिणाम होतो. आदिवासींना पोटभर जेवण मिळत नाही. आरोग्याच्या सुविधा मिळाल्या नाहीत. त्यामुळे जन्माला येणारी बालकं दोन किलो वजनाची जन्मतात. ० ते ६ वर्षाच्या मुलाचा कुपोषणामुळे मृत्यु होतो. सन १९९६ पासून आजपर्यंत १० हजार ७६२ बालकांचा कुपोषणाने मृत्यु झाला आहे. मेळघाटात दरवर्ष ७०० ते १००० बालकांचा कुपोषणामुळे मृत्यु होतो. २००७ - २००८ मध्ये ४४७ बालकांचा

International Monthly Research Journal, Akshardeep

ISSN 2278-8204
Vol.II. Issue : VII, January, 2014

कुपोषणाने मृत्यु झाला तर १९९६-९७ मध्ये सर्वात जास्त १०५० बालकांचा कुपोषणाने मृत्यु झाला. जिल्ह्यात एकूण ५६ प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत. मेळघाटातील २ लाख १९ हजार हेक्टर जंगलात ९८ उपप्राथमिक आरोग्य केंद्र, १२ प्राथमिक आरोग्य केंद्र, ३ आरोग्य ग्रामीण चिकित्सालय आहेत. २००१ मध्ये एका प्राथमिक आरोग्य केंद्रावर ६० हजार लोकांचा भार असल्यामुळे आरोग्य सुविधांचा पुरवठा होत नाही. विजेचा पुरवठा झाला नाही, तसेच सेधे रस्ते नाहीत. त्यामुळे मेळघाट भुख आणि अंधारात आहे.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ६२ वर्षात घटनेतील कलम ३६ से ४१ अंतर्गत सांगितल्या गेलेल्या सामाजिक तत्वामध्ये सामाजिक स्वास्थ्य बिघडविण्याच्या मादक पदार्थावर सार्वजनिक आरोग्याची व्यवस्था करण्यास सरकार बंधील राहील अशी घटनेत तरतूद असतानादेखील या मेळघाटातील आदिवासींना आरोग्याच्या सुविधा प्राप्त झाल्या नाहीत. जगातिकीकरणात सरकार खाजगीकरणावर भर देऊन सामाजिक न्यायाच्या तत्वाकडे दुर्लक्ष करून प्राथमिक शिक्षण, अरोग्य या सुविधा पुरविण्याची एक-एक स्वतःवरील जबाबदारी कमी करीत आहे. मेळघाटातील आदिवासींच्या कुपोषीत बालकांची गंभीर समस्या आहे. आज जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आदिवासींच्या या समस्येचे निराकरण होणार का? हा महात्वाचा प्रश्न शिल्लकच आहे.

शिफारसी :

१) जगातिकीकरणात सेझ, परकीय कंपन्यांना कारखान्यासाठी तसेच धरणं बांधण्यासाठी आदिवासी क्षेत्रातील जमीनी देतांना त्या आदिवासींचा विचार करून त्यांचे पुनर्वसन करून जमीनी घ्यावेत.

२) 'वनहक्क अधिनियम 2006' याची कडक अंबलबजावणी करून आदिवासींना जमीनी मुळवून घ्याव्यत.

३) जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्वाची पायमल्ली होणार नाही याची काळजी घ्यावी.

४) जगातिकीकरणाच्या प्रक्रियेत सरकारने आदिवासींसाठी 'सामाचिक न्याय' या तत्वाप्रमाणे कार्य करावे.

निष्कर्ष : आदिवासी समूह अतिदुर्गम जंगल, दऱ्या-खोऱ्यात राहणारा समूह आहे. हा समाज विकासापासून वंचित आहे, त्याच्या आर्थिक समस्या गंभीर स्वरूपांच्या आहेत. जगातिकीकरणच्या प्रक्रियेत दिवसे-दिवस आदिवासी विस्थापीत होत आहेत. विकासाच्या प्रक्रियेदून मोठमोठे धरणं, कारखाने निर्माण केल्याने अनेक आदिवासी विस्थापित झाले आहेत. त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न उजूनही सुटला नाही. खिश्चन धर्मप्रसारकामुळे सांस्कृतिक जीनव विघटीत होऊन आदिवासींच्या सांस्कृतिक समस्या निर्माण होत आहेत. मेळघाटातील कोरकू आदिवासींची आरोग्याची समस्या गंभीर स्वरूपाची आहे.

संदर्भ :

1) राम आहूजा - सामाजिक समस्याएं, रावत पब्लिकेशन एवं नई दल्ली.
2) समाजकल्याण सप्टें 2010
3) राम आहूजा -भारत का समाजशास्त्र, रावत पब्लिकेशन जयपूर एव नई दिल्ली.
4) श्यामंथन - ऑक्टोबर - डिसेंबर - 2010.
5) डॉ. प्रदिप आगलावे, भारतीय समाज संरचना आणि समस्या, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर